**महापारेषण**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडल, कराड

### प्रकल्पग्रस्तांकरीता जाहिरात क्र. ४/२०१७ अंतर्गत तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) पदावर नेमणूक करण्यासाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची तात्पुरती पुरवणी निवड यादी / प्रतिक्षा यादी

---------

महापारेषण कंपनीच्या कराड परिमंडल कार्यालयाने प्रसारित केलेल्या जाहिरात क्र.०४/२०१७ अन्वये प्रकल्पग्रस्तांकरीता तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) या पदासाठी दि. १७.०२.२०१८ रोजी घेण्यात आलेल्या ऑनलाईन लेखी परीक्षेत उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे तसेच जाहिरातीत देण्यात आलेली तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) पदांची उपलब्ध संख्या व सामाजिक आरक्षण वगैरे बाबी विचारात घेऊन तात्पुरते पात्र ठरलेल्या उमेदवारांची तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) या पदाची तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणेत आलेली आहे.

निवड करणेत आलेल्या उमेदवारांनादिनांक **२४ व २५ एप्रिल** २०१८ रोजी कागदपत्रे पडताळणी करीता परिमंडल कार्यालयात हजर राहण्याच्या सुचना दिलेल्या होत्या. त्या अनुषंगाने उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी करणेत आलेली आहे. कागदपत्रे पडताळणी दरम्यान काही उमेदवार हे अपात्र ठरलेले आहेत किंवा त्यांनी अर्जामध्ये चुकीची माहिती सादर केलेली आहे. त्यामुळे पुरवणी निवड / प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणेत येत आहे.

१. उमेदवारांची तात्पुरती निवड ही उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार तसेच उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये दर्शविलेली जात व इतर माहितीच्या आधारे करण्यात आलेली असून याबाबतची मूळ प्रमाणपत्रांची/ कागदपत्रांची पडताळणीवेळी तपासणी करण्यात येईल.

२. तात्पुरती निवड करण्यात आलेल्या सर्व उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, प्रकल्पग्रस्त, महापारेषण कंपनीचे प्रकल्पग्रस्त, तसेच म.रा.वि.मंडळ / महापारेषण कंपनीत यशस्वीरित्या वीजतंत्री या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबतचे सर्व मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे हि पडताळणीच्यावेळी सादर करणे बंधनकारक राहील व ती सादर करु न शकल्यास उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

३. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक मिळण्याबाबतचा कोणता ही हक्क उमेदवारांना राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ही निवड यादी पुर्णतः जाहिराती मध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता आणि इतर अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या अधीन राहून तयार करण्यात आली आहे.

४. तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) पदासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करिन नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींचा किंवा जाहिरातीमधील कोणत्याही अटींचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवारांची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे उमेदवारां जवळ असलेली पात्रता व सर्व आवश्यक कागदपत्रे ही जाहिरातीस अनुसरुन तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) या पदाकरिता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत धारण / प्राप्त केलेले असणे व वैध असणे आवश्यक आहे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ज्या उमेदवारांनी आवश्यक पात्रता व कागदपत्रे ही जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत धारण / प्राप्त केलेली नसतील व वैध नसतील अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही पत्र व्यवहाराची दखल महापारेषण कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही.

६. तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) या पदाच्या तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवार हे कागदपत्रे पडताळणीत अपात्र आढळून आल्यास प्रतिक्षा यादी कार्यान्वीत करण्यात येऊन त्या यादीतील उमेदवारांची पात्रता व कागदपत्रे पडताळणी करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. सदर प्रतिक्षायादीतील उमेदवार सुध्दा पात्रता व कागदपत्रे पडताळणीत अपात्र ठरल्यास त्याखालील गुणवत्ताधारक उमेदवारांची स्वतंत्र निवड / प्रतिक्षा यादी लावण्याचे आधिकार महापारेषण कंपनी राखून ठेवत आहे.

७. तदर्थ म.रा.वि.मंडळ/महापारेषण कंपनीत 'वीजतंत्री' या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केलेल्या सर्व अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांना जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे त्यांनी ऑनलाईन परिक्षेत मिळविलेल्या गुणांच्या १०टक्के अधिक गुण त्यांच्या लेखी परिक्षेतील गुणांमध्ये मिळवून येणा-या गुणांच्या आधारे अंतिम निवड यादी तयार करण्यात आली आहे. त्यासाठी उमेदवाराने अर्ज करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत धारण केलेले 'वीजतंत्री' या व्यवसायातील उमेदवारी पूर्ण केल्याबाबतचे तदर्थ म.रा.वि. मंडळ / महापारेषण कंपनीने जारी केलेले वैध प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

८. महापारेषण कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांना जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे त्यांनी ऑनलाईन परिक्षेत मिळविलेल्या गुणांच्या १०टक्के अधिक गुण त्यांच्या लेखी परिक्षेतील गुणांमध्ये मिळवून येणा-या गुणांच्या आधारे अंतिम निवड यादी तयार करण्यात आली आहे. त्यासाठी उमेदवाराने संबंधीत जिल्हाधिकारी / जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी जारी झालेले प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचे विहित नमुन्यातील अर्ज करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत धारण केलेले प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

९. निवडसूची बनविताना ज्या उमेदवारांचे एकत्रित मिळविलेले गुण समान होते त्यामधील तदर्थ म.रा.वि. मंडळाचे / महापारेषण कंपनीकडे 'वीजतंत्री' या व्यवसायात शिकाऊ उमेदवारी पूर्ण केलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच तदर्थ म.रा.वि. मंडळ / महापारेषण कंपनी किंवा बाह्यस्थ दोन किंवा अधिक उमेदवारांचे एकूण गुण समान असलेल्या उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेवून त्यांच्यातील जेष्ठताक्रम (वयाने जेष्ठ असणाऱ्यास प्राधान्य) ठरविण्यात आला आहे.

१०. तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) या पदाची तात्पुरती निवड/ प्रतिक्षायादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामूळे झालेल्या चुका सुधारीत करून योग्य ती कार्यवाही करण्याचा अधिकार महापारेषण कंपनीने राखून ठेवलेला आहे.

११. अयशस्वी उमेदवारांनी व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महापारेषण कंपनीकडे करू नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्रव्यवहाराची महापारेषण कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१२. तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) या पदाची तात्पुरती निवड/प्रतिक्षा यादीत समावेश असलेल्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीसाठी उमेदवारांनी खालील पत्त्यावर दि. **१६.०७.२०१८ रोजी १०.००** वाजता हजर रहावे.

**पत्ता :- मुख्य अभियंता, अउदा प्रकल्प तथा संवसु परिमंडल, कराड**
**प्रशासकिय इमारत, १ला मजला, मु. विजयनगर पो. सुपने**
**ता. कराड, जि. सातारा - ४१५ ११४**

१३. 'तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४)' या पदाची पुरवणी तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादी क्र. **३** खालीलप्रमाणे :-

| SELECT LIST | | | | |
|---|---|---|---|---|
| **SR. NO.** | **ROLL NO.** | **NAME OF THE CANDIDATE** | **CATEGORY** | **REMARKS** |
| 1 | 1310400642 | ABHIJIEET UTTAM BAMANE | SC | |
| **WAIT LIST** | | | | |
| 1 | 1110100110 | SOMNATH KISAN KARANDE | SC | |

सही/-
मुख्य अभियंता
अउदा प्रकल्प तथा संवसु परिमंडल, कराड

दिनांक:- १२.०७.२०१८